अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचे कार्यालय, ९१
सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई ४०० ०३०
दुरध्वनी क्र. २४९२१२१२, २४९२२६१८
E-mail addlcpacbmumbai@mahapolice,gov.in
दिनांक :- १६/०६/२०२६

**-: प्रेसनोट :-**

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | मुंबई विभाग |
| गु.र.क्र | १७/२०२६ |
| कलम | कलम ७ (अ), १२ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| आरोपी | १) मुस्तफा नुरमोहम्मद सेलोट, आरटीओ एजंट (खाजगी इसम)<br>२) राजेंद्र प्रसाद बिंद, आरटीओ एजंट (खाजगी इसम) |
| लाचेची मागणी | रू. ४,०००/- |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | तडजोडीअंती रू. ३,५००/- |
| थोडक्यात हकीगत | यातील तक्रारदार यांचे जप्त करुन ब्लॉक करण्यात आलेले ड्रायव्हिंग लायसन्स प्रादेशिक परिवहन विभाग, अंधेरी, मुंबई येथून परत मिळणेकरीता आरटीओ एजंट मुस्तफा नुरमोहम्मद सेलोट याने तक्रारदार यांचेकडे रू. ४,०००/- व लायसन्स रिनिवल साठी रु. ५,५००/- लाचेची मागणी केली. परंतू तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक ११/०६/२०२६ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई येथे समक्ष हजर राहून तक्रार दिली.<br>प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक १२/०६/२०२६ रोजी पंचासमक्ष करण्यात आलेल्या पडताळणी दरम्यान आरटीओ एजंट मुस्तफा नुरमोहम्मद सेलोट याने तक्रारदार यांचेकडे रू. ४,०००/- लाचेची मागणी करून तडजोडीअंती रू. ३,५००/- लाच स्विकारन्याचे मान्य करुन आरटीओ अधिकारी यांचेकडुन काम करवून देण्याचे आश्वासन दिले. त्यानुसार दिनांक १५/०६/२०२६ रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान आरटीओ एजंट मुस्तफा नुरमोहम्मद सेलोट याने तक्रारदार यांना रू. ३,५००/- लाचेची रक्कम दुसरा आरटीओ एजंट राजेंद्र प्रसाद बिंद यास देण्यास सांगितले. त्यानुसार आरटीओ एजंट राजेंद्र प्रसाद बिंद यास तक्रारदार यांचेकडुन लाचेची रक्कम रु. ३,५००/- स्विकारताना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. म्हणुन त्यांच्याविरूध्द भ्र.प्र.अधि. १९८८ चे कलम ७ (अ), १२ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. |

**सापळा अधिकारी :- श्री जगदिश मोरे, पोलीस निरीक्षक** **पर्यवेक्षक अधिकारी:- श्री. हरिदास किल्लेदार, सहाय्यक पोलीस आयुक्त**
मार्गदर्शक अधिकारी- श्री. संदिप दिवाण, अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. अनिल घेरडीकर, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

( अजित सुळे )
सहाय्यक पोलीस आयुक्त(प्रशासन),
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागा तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारसंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क :- **लाचलुचपत प्रतिबंधकविभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.**
**टोलफ्री क्र. १०६४, दूरध्वनी क्र. ०२२-२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२-२४९२२६१८**
**व्हॉट्सअप क्र.** :- **8828241064** **मोबाईल ॲप** :- **www.acbmaharashtra.net**
**वेबसाईट** :- **acbmaharashtra.gov.in, acbwebmail@mahapolice.gov.in**
**ईमेल** :- **addlcpacbmumbai@mahapolice.gov.in**
**फेसबुक** :- **www.facebook.com - Maharashtra ACB**